## हिंदुवरील अत्याचारात कझाकिस्तानचाही सहभाग

(पिंपळपार : सुधीर पाठक)

कझाकिस्तान हा सोवियत रशियाचा भाग होता. पेरेस्त्राईका व ग्लासनोस्तचे परिणाम रशियावर झालेत आणि रशियातील राज्ये फुटून बाहेर पडलीत. त्यात कझाकिस्तानचाही समावेश होता. साम्यवादी रशियात असताना कझाकिस्तानला आर्थिक प्रश्न नव्हते, पण स्वातंत्र्य मिळाल्यावर आर्थिक प्रश्न भेडसावू लागलेत. पूर्वी एक दिवस लाईनीत उभे राहून पाव मिळत होता. तो कमी पडला तरी त्या पावाचा भाव काय, हा प्रश्न निर्माणच होत नव्हता. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पावाचे भाव जनतेला समजू लागले. भरपूर पाव समोर दिसत असलेत तरी त्या पावाला पैसे पडतात व तेवढे पैसे कमवावे लागतात, याची जाणीव जनतेला झाली. ते पैसे कमविणे कठीण होऊ लागले.

२-३ वर्षांपूर्वी अटलजी पंतप्रधान होते, त्यावेळी त्यांच्या एका परदेश दौऱ्यात मला जाण्याची संधी मिळाली. आम्ही कझाकिस्तानला पोहोचले. हा भूभाग भारताच्या अतिशय जवळ आहे. काश्मीरमधून पाक वगळता कझाकिस्तानला जाता येते. फक्त तो शाही मार्ग नाही. अटलजींनी त्यावेळी कझाकिस्तान सरकारशी करार केला होता. वायव्य प्रांतात प्रवेश करण्यासाठी 'खैबर खिंड' ओलांडावी लागते. ती या करारान्वये उरली नव्हती. पाकिस्तान व अफगाणिस्तान या देशांच्या कृपेवर हा प्रवेश भारतीयांना मिळत होता. कृपा झाली नाही तर कझाकिस्तानला रशियामार्गेच प्रवेश करावा लागत होता. अटलजींचा हा करार अस्तित्वात आला असता, तर एक नवीन मार्ग उपलब्ध झाला असता. कझाकिस्तानचे आणखी एक वैशिष्ट्य आहे की, या देशातून अफगाणिस्तानच्या भूमीवर बॉम्बफेक करता येते. जेव्हा अमेरिकन फौजा तालिबानला नमवायला पुढे सरसावल्या तेव्हा त्यांनी कझाकिस्तानचा आश्रय घेतला होता. संयुक्त फौजा याच मार्गाने वाटचाल करीत होत्या व त्यांनी तालिबान्यांना पराभूत केले होते. अमेरिकेच्या नेतृत्वात फौजा कारवाई करणार, याचा विपरीत परिणाम होऊ नये म्हणून रशियानेही आपल्या फौजा कझाकिस्तानला पाठविल्या होत्या. आम्ही कझाकिस्तानला असताना रशियन फौजांचा मोठा तळ राजधानीच्या मध्यभागी होता. रशियाचे नियंत्रण या देशात जागोजागी दिसत होते. कझाकिस्तान हा देश अतिशय गरीब होता. गरिबांच्या या देशात पैशांची विलक्षण चणचण होती. भारतानंतर याच ठिकाणी भिकाऱ्यांचे तांडे बघायला मिळालेत. पोटाची खळगी भरणे हा या भागातील जनतेसमोर मोठा प्रश्न होता. बव्हंशी मुस्लिम जनता या देशात होती. धार्मिकदृष्ट्या मुस्लिम या देशात बहुसंख्यक होते. हिंदू त्याही वेळेला अल्पसंख्यक होते आणि आजही या स्थितीत फरक पडलेला नाही, तरी एकूण वातावरण हे धार्मिक दबावाचे नव्हते. बहुसंख्य, अल्पसंख्य या ठिकाणी एकजुटीने बंधुभावाने वागत होते. सर्वांना सारखे अधिकार प्राप्त झाले होते. मुस्लिम बहुसंख्य असूनही इतरांच्या धार्मिक भावभावनांची जपवणूक या देशात केली जात होती. बहुसंख्य व अल्पसंख्य स्नेहभावाने राहत होते व आपापल्या धर्माप्रमाणे पूजा-अर्चा करीत होते. पण मुस्लिम बहुसंख्यक देशातील ही परिस्थिती खूप दिवस अशीच राहिली नाही. बघता बघता धार्मिक प्रभाव वाढला. कझाकिस्तानात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनेत वाढ झाली आहे. हिंदूंच्या देवळांवर बुलडोझर फिरविण्यात आले आहेत. हिंदूंना आता त्या देशात जगणे अतिशय कठीण होऊ लागले आहे.

हिंदू फोरम ऑफ ब्रिटनने सांगितले की, जेव्हा ब्रिटनचे पंतप्रधान टोनी ब्लेअर, कझाकिस्तानचे अध्यक्ष नूर सुलतान नजर वायजे यांच्याकडे या घटनेबाबत तक्रार करीत होते. हिंदूंवरील वाढत्या अत्याचाराबाबत तीव्र निषेध करीत होते, त्याच वेळी कझाकिस्तानमधील सुप्रसिद्ध इस्कॉन मंदिर व हिंदूंच्या अकरा घरांवर बुलडोझर फिरविला जात होता. हा बुलडोझर व्यवस्थितपणे फिरविला जातो किंवा कसे याची काळजी घेण्यासाठी ७० पोलिस जवान तैनात करण्यात आले होते.

ज्या हिंदूंनी घरांचा मालकी हक्क मिळविण्यासाठी अर्ज केला होता, त्यांना असे मालकी हक्क मिळवायचे असतील, तर 'आम्ही हिंदू नाही' असे घोषित करण्याला सांगण्यात आले.

अन्यायाच्या या मालिकेत सरकारच विरोधात गेले असे नाही, तर न्यायालयेही हिंदूविरोधी सूर आळवू लागलेत. हिंदू कॉलेजासंदर्भातील सुनावणीत हिंदूंची बाजू ऐकून न घेता सर्वोच्च न्यायालयाने हिंदूविरोधी कौल दिला. अन्यायपरंपरेत, अत्याचारपरंपरेत न्यायालयानेही आपला वाटा उचलला होता.

हिंदूंच्या घरांवर बुलडोझर फिरविण्याची जी कारवाई झाली, तिथे नेतृत्व कझाकिस्तानच्या अध्यक्षांच्या भावाकडे होते. त्यांचे या कारवाईला पूर्ण समर्थन होते, असे वृत्त फोरमच्या मानवी हक्कविषयक वेबसाईटवर दाखविण्यात येत आहे. टोनी ब्लेअर यांनी या प्रकाराबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. ब्रिटनच्या नॅशनल कौन्सिल ऑफ हिंदू टेंम्पल्सचे अध्यक्ष सुदर्शन भाटिया यांनी सांगितले की, कझाकिस्तानमध्ये हिंदूंवरील अत्याचारांच्या घटनांचा संपूर्ण जगभरातून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. कझाकिस्तानच्या अध्यक्षांनी याप्रकरणी स्वत: जातीने लक्ष घालून, हिंदूंवर यापुढे तरी अत्याचाराच्या घटना घडू नयेत यासाठी प्रयत्न करण्याची मागणी भाटिया यांनी केली आहे. या प्रकरणी ब्रिटिश संसदेमध्येही तीव्र

पडसाद उमटले आहेत. या संदर्भात इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्समधील भारतीय वंशाचे मजूर पक्षाचे सदस्य अशोककुमार यांनी विशेष प्रस्ताव सादर केला आहे. हिंदूंवर कझाकिस्तानमध्ये होत असलेल्या अत्याचाराच्या घटनांचा निषेध व्यक्त करणारा हा प्रस्ताव संमतसुद्धा झाला आहे.

कझाकिस्तानमध्ये धार्मिक अल्पसंख्यकांचे ७३ समूह आहेत. या अल्पसंख्यकांच्या रक्षणाची ग्वाही कझाकिस्तानची घटना देते. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये तेथे धार्मिक असहिष्णुता वाढीस लागली असून, हिंदू त्याचे बळी ठरत आहेत, असे आढळते. 'कृष्णाची पूजा करायची असेल तर भारतात चालते व्हा,' असे स्थानिक प्रशासनाने हिंदूंना सांगितल्याचे वृत्त आहे.

अफगाणिस्तानमध्ये हिंदू आणि शीखपंथीयांवरील अन्यायाचे सत्र थांबलेले नाही. हिंदू वा शीखपंथीय मुले कंदाहारच्या रस्त्यावरून जाताना कट्टरपंथीय मुस्लिम त्यांच्यावर दगड भिरकावतात. एवढेच नव्हे, हिंदू आणि शीखपंथीयांची घरे आणि व्यवसाय स्थानिक लोकांनी ताब्यात घेतले आहेत. या लोकांची मुले शाळेतही जाऊ शकत नाहीत कारण तिथे त्यांच्या मुलांना प्रवेश नाकारला जातो, अशा अनेक घटना घडत असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

कझाकिस्तानमधील या घटनांचा जगभरातून निषेध सुरू आहे, पण आपल्या संपुआ सरकारला मात्र अजूनही त्यांचा निषेध करावा असे वाटले नाही. ब्रिटनचे पंतप्रधान टोनी ब्लेअर हिंदूंच्या व्यथांबाबत कझाकिस्तानशी बोलू शकतात, पण भारताच्या पंतप्रधानांना मात्र त्यावर विचार करावा असेही वाटत नाही. सरदार मनमोहनसिंग हे स्वत: शीख संप्रदायातील कार्यकर्ते आहेत. त्यांना अल्पसंख्यकांच्या वेदना नवीन नाहीत. पण त्या व्यथा जगापुढे मांडाव्यात, असे त्यांना वाटले नाही. भारतामधील संपुआचे सरकार किती मुस्लिम अनुनयाच्या मागे आहे, त्याचे हे उदाहरण मानता येईल. कझाकिस्तानमध्ये हिंदूंवर अन्याय सुरू आहे हे भारतातील मुसलमानांना कळले आणि आपण कझाकी मुसलमानांचा निषेध सुरू केला तर मतपेटी भारतात आपल्या विरोधात जाईल, अशी त्यांना भीती आहे. म्हणून पंतप्रधान एक शब्दही या विषयावर उच्चारू इच्छित नाहीत, ही भारताची शोकांतिकाच म्हणावी लागेल.